-: प्रेसनोट दिनांक - ०१/०७/२०२६ :-

आरोपी लोकसेवक विजयकुमार विलास वनमोरे, वय - ५० वर्षे, पद - शाखा अभियंता, वर्ग - २, नेमणुक सार्वजनिक बांधकाम विभाग शाहुवाडी, जि.कोल्हापूर मुळ रा. प्लॅट नंबर २०५, संजय अपार्टमेन्ट , कोयना वसाहत, कराड, ता. कराड, जि.सातारा, सद्या रा. ओकोली रोड, शाहुवाडी, ता.शाहुवाडी, जि. कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत.......

---

तक्रारदार हे सार्वजनिक बांधकाम विभाग, शाहुवाडी मार्फत निघणारे रस्त्याचे, गटारी व पुलांची कामे मुख्य ठेकेदार यांच्याकडुन सब ठेकेदार म्हणुन घेवुन पुर्ण करून देत असतात त्यांनी शिराळे वारुनच्या ब्रिजचे काम व कर्नाळवाडी (धनगरवाडा) ते सोनारवाडी (विरळे) गावातील रस्त्याचे काम केले आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग शाहुवाडी येथील शाखा अभियंता विजयकुमार वनमोरे यांनी तक्रारदार यांच्याकडे कर्नाळवाडी (धनगरवाडा) ते सोनारवाडी (विरळे)हददीपर्यंतचे दोन किलोमिटर रस्त्याचे मुरमीकरण व खडीकरण व शिराळे वारुन पुलाचे कामाचे बिल मंजुर केले म्हणुन असे ३४,७००/- रूपये दयावे लागतील असे म्हणुन तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केली. म्हणुन तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता, पडताळणीमध्ये तक्रारदार व वनमोरे, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग शाहुवाडी यांची भेट होवुन त्यांच्यामध्ये तक्रारदार यांनी शिराळे वारुनच्या ब्रिजचे काम व कर्नाळवाडी (धनगरवाडा) ते सोनारवाडी (विरळे) गावातील रस्त्याचे कामाचे अनुषंगाने चर्चा होवुन वनमोरे यांनी दोन्ही कामाचे बिल मंजुर करून दिले म्हणुन तक्रारदार यांच्याकडे ३८,०००/- रूपयांची मागणी करून ते घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता, पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन आरोपी लोकसेवक विजयकुमार विलास वनमोरे, वय - ५० वर्षे, पद - शाखा अभियंता, वर्ग - २, नेमणुक सार्वजनिक बांधकाम विभाग शाहुवाडी यांनी ३८,०००/- रुपये लाच स्विकारलेने, त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदरबाबत आरोपी लोकसेवक विजयकुमार विलास वनमोरे, वय - ५० वर्षे, पद - शाखा अभियंता, वर्ग - २, नेमणुक सार्वजनिक बांधकाम विभाग शाहुवाडी, जि.कोल्हापूर मुळ रा. प्लॅट नंबर २०५, संजय अपार्टमेन्ट , कोयना वसाहत, कराड, ता. कराड, जि. सातारा, सद्या रा. अकोली रोड, शाहुवाडी, ता.शाहुवाडी, जि. कोल्हापूर यांचेविरूध्द शाहुवाडी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. अर्जुन भोसले, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार,वैष्णवी पाटील, पोलीस उपअधीक्षक स.पो.उप निरीक्षक प्रकाश भंडारे,पो.हे.कॉ.विकास माने, पो.हे.कॉ. संदिप काशीद, पो.ना.सचिन पाटील,. पो. कॉ. उदय पाटील, चा.पो.कॉ. प्रशांत दावणे अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील,पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९७६४१४०७७७. ९४०४३२१०६४ कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री कमांकः- १०६४.